साप्रवि/गट-८(खका)/न.क्र.१४७/
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कं.मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत
तळ मजला,धारावी रोड,माटुंगा
**मुंबई - ४०००१९.**

**<u>प्रशासकीय परिपत्रक क्र.४५ दि.८/५/२००६</u>**

विषय : वितरण कंपनीच्या कर्मचारी सेवाविनियम क्र.१०३ (ख) (ज)मध्ये सुधारणा करण्याबाबत.

.....

म.रा.वि.मंडळ कर्मचारी सेवाविनियम क्र.१०३ (ख) (ज) मधील उच्च शैक्षणिक अर्हता संपादन केल्याबद्दल एक आगाऊ वेतनवाढ द्यावयाच्या तरतुदीचा लाभ म.रा.वी.वितरण कंपनीतील दक्षता व सुरक्षा संवर्गातील कर्मचा-यांना देताना त्यांच्यासाठी काही अतिरिक्त शैक्षणिक अर्हता विहित करण्यात यावी याबद्दलचा प्रस्ताव व्यवस्थापकीय संचालक (मरावीविकंम) यांच्या विचाराधीन होता. या अनुषंगाने सर्वंकष विचारांती व्यवस्थापकीय संचालक (मरावीविकंम) यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचारविनिमय करुन कर्मचारी सेवाविनियम क्र.१०३ (ख) (ज) मध्ये खालील प्रमाणे बदल करण्यास मंजुरी दिली आहे.

(ज) **<u>द.व सु.संवर्ग</u> :-**

१) मान्यताप्राप्त विद्यापीठाची कायदा या विषयातील एल्.एल्.एम्.ही पदव्युत्तर पदवी (एल.एल्.बी. ही पदव्युत्तर पदवी नव्हे.)

२) मान्यताप्राप्त विद्यापीताने दिलेली व्यवस्थापन/प्रशासन (म्हणजेच व्यवसाय व्यवस्थापन/व्यवसाय प्रशासन /खरेदी – विक्री व्यवस्थापन /भांडार व्यवस्थापन / कर्मचारीवर्ग व्यवस्थापन आणि वित्तीय व्यवस्थापन इत्यादी) या विषयातील पदव्युत्तर पदवी किंवा भारत सरकारने/राज्य सरकारने पदव्युत्तर पदवी समतूल्य म्हणून मान्यता दिलेली, मान्यताप्राप्त विद्यापीठाची व्यवस्थापन/प्रशासन या मधील कोणतीही शैक्षणिक अर्हता.

२. दक्षता व सुरक्षा संवर्गात उपरोक्त शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण केलेल्या कर्मचा-यांची प्रकरणे प्रलंबित असल्यास ती वरील तरतुदीनुसार निकाली काढावीत व सदर कर्मचा-यांना एक आगाऊ वेतनवाढ त्यांनी उपरोक्त शैक्षणिक अर्हता उत्तीर्ण झाल्याच्या तारखेपासून मंजूर करण्यात यावी. सेवाविनियम क्र.१०३ (ख) मधील इतर बाबी अबाधीत व लागू राहतील.

३. हे प्रशासकीय परिपत्रक व्यवस्थापकीय संचालक (मरावीविकंम) यांनी संचालक (संचलन) व संचालक (वित्त) यांच्याशी विचार विनिमय करुन दिलेल्या मंजुरीने निर्गमित करण्यात येत आहे.

सुयपाटील

**( सु. य. पाटील )**

**मुख्य महाव्यवस्थापक (क)**

प्रत :

प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना

***K/Adm.Cir.103(k)-7***